# गावडे आंबेरे घराणे

गावडे आंबेरे हे गांव रत्नागिरीपासून २६ कि.मी वर रत्नागिरी–भडे या रस्त्यावर आणि पावस पासून ६ कि. मी. वर आहे. मावळंगे जवळील नदीला पावसात पूर येत असल्याकारणाने व नदीवर पूल नसल्याकारणाने बसने जाणारी वाहतूक पावसात काही काळ खंडित होते. गावडे आंबेरे या ठिकाणी १२ वाड्या असून एकूण लोकवस्ती २००० चे आसपास आहे पाटाच्या बाजूने काळथर दगडांनी सडक बांधलेली असून दोन्ही बाजूला घरे आहेत. हे गांव अंदाजे १२०० वर्षापूर्वी वसविलेले होते असे म्हणतात. या ठिकाणची प्राथमिक शाळा इ.स. १८७५ साली स्थापन झाली व तिथून ती हल्लीच्या जागी इ.स. १९७५ मध्ये बांधण्यात आली. पाटाच्या वरच्या बाजूस अभ्यंकरांची तीन घरे असून पाटाच्या खालच्या बाजूस विश्वेश्वर मंदिराजवळ तीन घरे आहेत. पैकी सध्या वास्तव्य फक्त एकाच घरात आहे. व्यवसाय मुख्यत्वे शेती, बागायती व भिक्षुकी आहे. अभ्यंकरांप्रमाणेच केळकर, फडके, इ. ब्राम्हण कुटुंबे रहातात. कुर्धे या गावी ज्या वेळेस वस्ती अभ्यंकर–खोत यांनी केली, त्याच सुमारास गावडे–आंबेरे येथेही अभ्यंकर कुटुंबे रहावयास आली असावी असे दिसते. सध्या अस्तित्वात असलेली घरे व वास्तव्य करीत असलेल्यांची नावे पुढीलप्रमाणे :–

१) डॉ. भालचंद्र रामचंद्र अभ्यंकर, पुणे यांची मातोश्री सीताबाई रामचंद्र अभ्यंकर, वय ८० २) जगन्नाथ सखाराम अभ्यंकर ३) महादेव गंगाधर अभ्यंकर ४) मधुसूदन दामोदर व दत्तात्रय दामोदर अभ्यंकर यांचे घर–घरात वास्तव्य नाही. ५) शंकर गोविंद अभ्यंकर (कंत्राणे) उपाध्ये. ६) शंकर अनंत अभ्यंकर – वास्तव्य नाही – मृत १९८७. ७) नारो बाबजी अभ्यंकर – नगरकर यांचे घरात वस्ती नाही.

तथापि गावडे आंबेरे हे आपले मूळगांव आहे असें सांगून माहिती देणाऱ्या बंधूचे शक्यतो त्या त्या घराण्यात अंतर्भाव करून वंशावळीतील बंधूंच्या स्थलांतरानुसार घराण्यांचे क्रमांक खालीलप्रमाणे दिले आहेत.


**कुलधर्म व कुलाचार** –गावडे आंबेरे येथील सर्व अभ्यंकर कुटुंबांत गुहागरचा व्याडेश्वर कुलदेव व अंबेजोगाईची योगेश्वरी कुलदेवता मानतात. कुलधर्म म्हणून मार्गशीर्ष महिन्यात बोडण घालण्याची पद्धत आहे. नवरात्रांत देवीचा उत्सव असतो. महालक्ष्मीची पूजा करण्याची प्रथा आहे. त्याशिवाय ग्रामदेवता म्हणून जाखाई, जुखाई व काशी विश्वेश्वराची पूजा करतात.

## गावडे आंबेरे घराणे क्रमांक १

### गावडे आंबेरे–नाखरे–मुंबई–पुणे.

१/१ **वामन**– # ज्ञात मूळपुरूष
२/२ **रघुनाथ वामन**– #
कन्या :
१) **जिऊ बाई**–इतर माहिती मिळाली नाही.
२) **येसू बाई**–इतर माहिती मिळाली नाही.
३) **वाराणशी**–इतर माहिती मिळाली नाही.
४) **भीमा**–इतर माहिती मिळाली नाही.
५) **दुर्गा**–इतर माहिती मिळाली नाही.
३/३ **वामन रघुनाथ**–अपत्य नाही.
४/३ **सदाशिव रघुनाथ**– # यांना ५ पुत्र व १ कन्या.
कन्या : वेणू–इतर माहिती मिळाली नाही.
५/४ सीताराम सदाशिव– #
६/४ **विश्वनाथ सदाशिव**–जन्म १८७०. मृत्यू १९४३.
भार्या : **भागिरथी उर्फ सगुणा**–
कन्या : **लीलावती**–
७/५ **विद्याधर विश्वनाथ**–जन्म २।२।१९१४. कराची येथे. मृत्यू १९।१।१९८५. दादर मुंबई.
भार्या : **इंदुमती**–सासर–इंदुमती जनार्दन गोखले. जन्म १९२३. हयात.
कन्या : **नलिनी**–जन्म १९४१.सासर–प्रभावती श्रीधर जोगळेकर.
८/६ **प्रभाकर विद्याधर**–जन्म २७।७।१९४१, मुंबई येथे. शिक्षण–बी. एस्सी., डी. ई. आर. ई., डी. ओ. आर.

## गावडे आंबेरे घराणे क्रमांक १
## गावडे आंबेरे–नाखरे–मुबंई–पुणे




एम्. नोकरी—निर्मल रोलर बेअरिंग कं. (एन्.आर.बी.) ठाणे येथे. कंपनीतर्फे फ्रान्सला काही काळ वास्तव्य होते. वास्तव्य—२६/ब, सुमंगल सोसायटी, ईस्टर्न एक्सप्रेस हायवेजवळ, चुनाभट्टी, मुंबई—२२.
भार्या : **मृणालिनी** –माहेर—वासंती दत्तात्रय साने. चिपळूण.

९/७ **मनमोहन प्रभाकर**–जन्म २।६।१९७०. शिक्षण—बी.कॉम्. द्वितीय वर्ष शिकत आहे.
१०/७ **मयुरेश प्रभाकर**–जन्म १६।३।१९७५. इयत्ता १० वीत शिकत आहे.
११/६ **मकरंद विद्याधर**–जन्म १९६४. शिक्षण—बी.ए.एम्.एस्. उत्तीर्ण.

१२/४ **गोविंद सदाशिव–** #
भार्या : **गंगा–**
कन्या : **भीमाताई–**
१३/४ **चिंतामणी सदाशिव–** #
१४/४ **दिनकर सदाशिव**–वयाचे ६५ व्या वर्षी मृत्यू. व्यवसाय–पोष्टखात्यात नोकरी. वास्तव्य–केशवजी नाईक चाळ, गिरगांव, मुंबई.
भार्या : **गौरी**–माहेर–यांना ४ पुत्र.
१५/५ **रघुनाथ दिनकर**–शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–पोष्टात नोकरी.
भार्या : **गौरीबाई–**
कन्या :
१) **भाग्यश्री**–सासर–बर्वे.
२) इंदू–सासर–केळकर.
३) **मनुताई–**
१६/६ **भास्कर रघुनाथ**–जन्म माहित नाही. मृत्यू २३ ।६ ।१९८३. गिरगांव येथील विठोबाशेठ अभ्यंकर यांची टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट चालवावयास इ.स. १९८० मध्ये घेतली.
भार्या : **प्रभावती**–माहेर–कमल दत्तात्रय काळे. बडोदे. वास्तव्य–९३ ।११५, कोळ्याची चाळ, फणस वाडी, मुंबई.
कन्या :
१) **मंगल**–जन्म १९५१. सासर–साठे. दिल्ली.
२) **शरयू**–जन्म १९४५. सासर–गणपुले. दादर.
१७/७ **अशोक भास्कर**–जन्म १४ ।१ ।१९४८. मुंबई. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– वडिलांनी घेतलेली टाईपरायटिंग संस्था–अभ्यंकर्स शॉर्टहॅंड अॅंड टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट, १७८, प्रार्थना समाज, गिरगाव, मुंबई–४. ही संस्था नावारुपास आणण्यासाठी खूप धडपड. लेसर बीमने टाईप सेटींगचे आधुनिक तंत्रज्ञान विकसित करून इंग्रजी, हिंदी, मराठी व गुजराथी भाषांमध्ये तिथें कामे केली जातात. दिलदार व हुरहुन्नरी स्वभाव. त्यामुळे लोकप्रिय. गाणे, यंत्र दुरुस्ती, पोहणे, योगासने इ. ची आवड, १९८१/८२ मध्ये बॅंकॉक, सिंगापूर येथे परदेशगमन. फोटो कॉपीअर व इलेक्ट्रॉनिक टाईपरायटरचे व्यावसायिक शिक्षण अवगत. वास्तव्य – ९३ ।११५ कोळ्याची चाळ, फणसवाडी, मुंबई–२.
भार्या : **विद्यागौरी**–माहेर–विद्या दत्तात्रय साने. पुणे.
कन्या :
१) **लिना**–जन्म २४ ।२ ।१९७७. इयत्ता ६ वी त शिकत आहे.
२) **हेमांगी**–जन्म ५ ।१ ।१९८१. इयत्ता २ रीत शिकत आहे.
१८/७ **अरुण भास्कर**–जन्म १९५४. कॉम्प्युटर व टाईपरायटिंगचे व्यावसायिक शिक्षण – टाईपरायटिंग इन्स्टि. मध्ये भागीदार. वास्तव्य–९३/११५, कोळ्याची चाळ, फणसवाडी, मुंबई–२.
भार्या : **ज्योत्स्ना**–माहेर–जोशी.
१९/८ **आशुतोष अरुण**–जन्म ४ ।१२ ।१९८५.
२०/५ **गणेश दिनकर**–नोकरी नाही. धंदा होता.
भार्या : **सारजा (शारदाबाई)** –माहेर–वारुणी लेले, गोळप. ता. रत्नागिरी.
२१/५ **विनायक दिनकर**–जन्म १९००. मृत्यू २८ ।५ ।१९५३. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय– मुंबई येथे म्युनिसिपालिटीत नोकरी. वास्तव्य–मांगलवाडी गिरगांव, मुंबई–४.
भार्या : **इंद्रिराबाई (उमा काकू)** –माहेर–कृष्णाबाई काशीनाथ सोहनी. जन्म १९१२. मृत.
कन्या : **सुनंदा**–जन्म ४ ।३ ।१९३६. सासर–सुनिती दत्तात्रय आगाशे, शुक्रवार पेठ, पुणे. हल्ली वास्तव्य– युनायटेड वेस्टर्न बॅंकेवर, दामलेवाडा, बाजीप्रभू चौक, फडके रस्ता, डोंबिवली. (पूर्व).
२२/६ **श्रीधर विनायक**–जन्म १५ ।४ ।१९२८. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनमधून निवृत्त. वास्तव्य–१८४/ब विष्णुपद्म सोसायटी, शनिवार पेठ, पुणे–३०.
भार्या : **सुशिला**–जन्म २१ ।८ ।१९३९. माहेर–सुशिला डोंगरे, मळेवाड, ता. सावंतवाडी.
कन्या :
१) **सुरेखा**–जन्म २० ।७ ।१९६३. सासर–सुप्रिया शिरीष सोवनी. गोखले इन्स्टिट्यूट, पुणे येथे नोकरी. पति–शिरीष घनःश्याम सोवनी, डोंबिवली.
२) **सुगंधा**–जन्म १९ ।५ ।१९६८.
२३/६ **वामन विनायक**–जन्म ५ ।८ ।१९३०.

शिक्षण—बी. ए. व्यवसाय—लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्ये नोकरी. वास्तव्य—जीवनसुधा सोसायटी. जुहूलेन, अंधेरी (प.)
भार्या : **सुनीता**—जन्म १५ ।२ ।१९४१. शिक्षण—बी. ए., बी. एड्. शिक्षिका. माहेर—मालती मराठे, कुर्धे.
कन्या :
१) **मेधा**—जन्म २ ।४ ।१९६६. शिक्षण—बी. ई. (केमिस्ट्री) एम्. एस्सी.
२) **मनीषा**—जन्म ८ ।६ ।१९६८. शिक्षण—एस्. एस्सी.
२४/६ **माधव विनायक**—जन्म ७ ।९ ।१९३८. शिक्षण—बी. ए. व्यवसाय—लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्ये अकौंट्स् ऑफिसर.
भार्या : **शीला**—माहेर—शीला जोगळेकर. गोरेगांवकर चाळ, गिरगांव, मुंबई—४.
कन्या : **शिल्पा**—जन्म १८ ।११ ।१९७६.
२५/६ **विजय विनायक**—जन्म १६ ।९ ।१९३३ शिक्षण—बी. ए. व्यवसाय—नॅशनल व ग्रिंडलेज बँकेत नोकरी.
भार्या : **सरला**—माहेर—सरला मनसुखानी. शिक्षण—बी. एस्सी. ग्रिंडलेज बँकेत नोकरी.
कन्या : **दीपिका**—जन्म २८ ।१२ ।१९७७.
पुत्र—**पवन**—जन्म १८ ।१२ ।१९७३.
२६/६ **दत्तात्रय विनायक**—जन्म ११ ।७ ।१९४७. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—जी. के. डब्लू. भांडूप येथे ऑपरेटर म्हणून नोकरी. वास्तव्य—१२/२, मंजुळा सोसायटी, घनःश्याम गुप्ते रोड, डोंबिवली (पश्चिम).
भार्या : **सुवर्णा**—माहेर—कुमुद त्रिंबक सोहनी, म्हसेळें. ता. श्रीवर्धन. वय—५६. अपत्य नाही.
२७/५ **रामचंद्र दिनकर**—जन्म गावडे आंबेरे येथे. मृत्यू २१ ।३ ।१९३५. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—जी. आय. पी. रेल्वेमध्ये १९३१ पर्यंत नोकरी.
भार्या : १) **सीताबाई**—माहेर—दारशेतकर, गोरेगांव. (रायगड). २) **रमाबाई**—माहेर—देवधर ३) **सीताबाई**—जन्म १९१३. माहेर—काशी हरिभाऊ केळकर. वास्तव्य—गावडे आंबेरे, हयात.
२८/६ **शंकर रामचंद्र—जन्म** १९२३. शिक्षण—मराठी ४ थी व वेदविद्या. व्यवसाय—पौरोहित्य. वास्तव्य—कर्जत.
कन्या : **अलका**—सासर—अलका श्रीकृष्ण जोशी, एस्. एस्. सी. नोकरी—ऑल इंडिया रेडिओ, मुंबई. वास्तव्य—द्वारा श्री. के. जोशी अय्यंगार वाडा, विठ्ठल नगर, (गोगटे पोहा मिलजवळ) कर्जत. जि. रायगड.
२९/६ **भालचंद्र रामचंद्र**—जन्म २२ ।७ ।१९३०. शिक्षण—आयुर्वेद विशारद. व्यवसाय—सन १९५८ ते १९६८, पर्यंत चिकित्सक वैद्य म्हणून संजीवन औषधालय पुणे येथे नोकरी. शिवाय पार्ट टाईम स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय. सन १९६८ ते १९८४ — आयुर्वेद रसशाळा, कर्वे रोड, पुणे — ४ या आयुर्वेदीय औषध निर्मिती कारखान्यांत प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून नोकरी. सन १९८५ पासून स्वतःचा औषध निर्मिती उद्योग 'शारंगधर फार्मासिटिकल्स्' ९१/१ पर्वती, पुणे — ९ येथे चालू वैद्यकीय व्यवसाय 'शारंगधर औषधालय', ११६८, बुधवार पुणे येथे आहे.
भार्या : **सुमती**—माहेर—सुमन रामचंद्र गोडबोले, नाशिक. जन्म १९३१. शिक्षण—बी. ए. एस्. एफ्. व्यवसाय—१९५८ ते ७२ वाडीया हॉस्पिटल पुणे येथे आर. एम्. ओ. ची नोकरी १९७२ नंतर स्वतःचा व्यवसाय.
३०/७ **मुकुंद भालचंद्र**—जन्म १८ ।८ ।१९६१. पुणे. शिक्षण—सी. ए. व्यवसाय—चार्टर्ड अकौंटंट.
भार्या : **स्वाती**—शिक्षण—बी. कॉम. माहेर—स्वाती केशव पेंडसे, सातारा.
३१/८ **श्रीरंग मुकुंद**—जन्म ३० ।१ ।१९८८.
३२/७ **जयंत भालचंद्र**—जन्म २१ ।५ ।१९६३. पुणे. शिक्षण—बी. एस्सी.; डी .ई. आर. ई व आयुर्वेदाचा बी. ए. एम्. एस्. कोर्स चालू.
३३/३ **पद्माकर रघुनाथ**— #
३४/४ **सखाराम पद्माकर**—शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—शेती, गायन आणि पेटी व तबला वादनाची आवड.
कन्या :
१) **नर्मदा**—सासर—सरस्वती नारायण गोखले, सोमेश्वर, ता. रत्नागिरी.
२) **वेणू**—सासर—लीला जगन्नाथ फडके, कुर्धे.
३५/५ **नरहर सखाराम**—व्यवसाय—भिक्षुकी शेतीसाठी गावडे आंबेरे येथून नाखरे येथे आले.

भार्या : **रमाबाई**–माहेर–द्वारका सदाशिव ताम्हनकर, कुवेशी. ता. राजापूर.
कन्या :
१) **सुमती**–जन्म १९३९. सासर–सुधा पांडुरंग पाटणकर, रत्नागिरी.
२) **इंदुमती**–जन्म १९४५. सासर–सुषमा शरद जोशी ता. कसबे जि. संगमेश्वर.
३) **भारती**–जन्म १९४९. सासर–शैलजा अशोक सरदेसाई, शिक्षण–बी. ए. वास्तव्य–कसबे, ता. संगमेश्वर.
३६/६ **यशवंत नरहर** –जन्म २ ।४ ।१९४०. नाखरे येथे. शिक्षण–मॅट्रिकपर्यंत, वायरमन, ऑईल इंजिन कोर्स पूर्ण महाराष्ट्र शासनाच्या कृषि खात्यात मेंटेनन्स, फिटर.
भार्या : **माधुरी**–माहेर–प्रभावती दामोदर केळकर–मावडे आंबेरे जन्म १५ ।३ ।१९५१. शिक्षण–एस्. एस्. सी.
कन्या : **प्रीती**–जन्म २४ ।३ ।१९७८. शिक्षण–६ वीत शिकत आहे. गायन, खेळ, पोहण्याची आवड.
३७/७ **प्रदीप यशवंत**–जन्म २७ ।९ ।१९७३. दापोली, शिक्षण–११ वी सायन्स, ड्रॉईंग २ री परीक्षा, हिंदी ३ री परीक्षा उत्तीर्ण.
३८/३ **महादेव रघुनाथ**– #


# गावडे आंबेरे–धोंडभट घराणे क्रमांक २.

## गावडे आंबेरे–शिरपुर–कल्याण–मुंबई

१/१ **धोंडदेव**–हा या घराण्याचा ज्ञात मूळ पुरूष त्याची अधिक माहिती मिळाली नाही.
२/२ **हरि धोंडदेव**– #
३/३ **बल्लाळ हरि**– #
४/४ **रामचंद्र बल्लाळ**– #
५/५ **गणेश रामचंद्र**– #
६/६ **बल्लाळ गणेश**– #
७/७ **नारायण बल्लाळ**– #
८/८ **काशीनाथ नारायण**–व्यवसाय–पोलीस खात्यात नोकरी. वास्तव्य–शिरपूर येथे.
भार्या : **लक्ष्मी**–माहेर–बर्वे. गांवखडी.
कन्या : **नर्मदा**–सासर–जोशी. पालघर.
९/९ **दामोदर काशीनाथ**–मृत्यू १९४६.
व्यवसाय–किराणा सामानाचे दुकान. वास्तव्य– पालघर जि. ठाणे.
भार्या : **कुसुम**–माहेर–मोडक.
कन्या : **रजनी**–सासर–रजनी रामचंद्र गोखले. वास्तव्य–पुष्पमिलन सोसायटी, संत रामदास रोड, मुलुंड (पूर्व.) व्यवसाय–मुंबई नगरपालिकेत लिपिकची नोकरी.
१०/१० **श्रीकांत दामोदर**–अंदाजे वय ४०. वास्तव्य–जव्हार जि. ठाणे. व्यवसाय–शेती.
११/९ **जनार्दन काशीनाथ**–मृत्यू १९४५.
व्यवसाय–नाशिक येथे किराणा मालाचे दुकान. वास्तव्य–नाशिक अविवाहित.
१२/८ **प्रभाकर नारायण**–जन्म पावस येथे. परंतु वास्तव्यासाठी शिरपुर येथे होते. अधिक माहिती नाही अपत्य नाही.
१३/८ **विष्णू नारायण**–जन्म १९ ।२ ।१८८६. मृत्यू १९५६. शिक्षण–मराठी ७ वी थर्ड इयर ट्रेन्ड. व्यवसाय–शिक्षकाची लोकलबोर्डात नोकरी होती. वास्तव्य–नंदूरबार जि. धुळे.
भार्या : **रमाबाई**–माहेर–लक्ष्मीबाई केशव जोशी, जबलपूर.
कन्या :
१) **लीला**–जन्म १९१८. सासर–कमला विष्णू पिंपळखरे, पुणे.
२) **काशी**–जन्म १९३०. सासर–मालती विष्णू जोशी, पार्लेश्वर सोसायटी, विलेपार्ले (पूर्व). मुंबई–५७.
३) **विमल**–जन्म १९४०. सासर–विमल माधव निजसुरे. पुणे.
१४/९ **विश्वनाथ विष्णू**–जन्म १० ।११ ।१९१९ शिरपूर जि. धुळे येथे. शिक्षण–पूर्वीची इंग्रजी ४ थी. व्यवसाय–१९४३ ते १९६४ पर्यंत मिरज येथे बुक बाँड चहा कंपनीत गोडाऊन कीपर णून व १९६४ ते १९८० पर्यंत हैद्राबाद येथे बुक बाँड चहा कंपनीत स्टोअर कीपर म्हणून काम केले. वास्तव्य–शिधये वाडा, ब्राह्मणपुरी, मिरज, जि. सांगली.

## गावडे आंबेरे–धोंडभट घराणे क्रमांक २
## गावडे आंबेरे–शिरपुर–कल्याण–मुबंई


पि. क्र. व्य. क्र.



भार्या : **कुमुदिनी**–जन्म १९२६. माहेर–लीला विनायक बर्वे, इचलकरंजी.
कन्या :
१) **वासंती**–जन्म ३० ।३ ।१९५०. शिक्षण–बी. ए. कोल्हापूर. सासर–अनुराधा अरविंद रानडे, ठाकूरद्वार मुंबई–२.
२) **विजया**–जन्म ४ ।८ ।१९५१. शिक्षण–एम. ए. कोल्हापूर. सासर–प्रतिभा प्रमोदराव ताम्हनकर, सांगली.
३) **चित्रा**–जन्म ११ ।२ ।१९५५. इचलकरंजी येथे. शिक्षण– बी. ए., कोल्हापूर. सासर–मृणाल शरद आपटे, जमखिंडी (कर्नाटक राज्य.).
४) **रेखा**–जन्म ६ ।१० ।१९५७. शिक्षण–बी.कॉम्. कोल्हापूर. सासर–रेखा सतीश खरे, सटाणे (ता. बांगलाण)
१५/१० **विलास विश्वनाथ**–जन्म १४ ।१० ।१९४५. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–सांगली बँक, मिरज, पंढरीची ६ वेळा चालत वारी केली. वास्तव्य–सिद्धये वाडा, ब्राह्मणपुरी, मिरज ४१६४१०.
भार्या : **अपर्णा**–माहेर–मंदाकिनी भिकाजी केतकर.
कन्या :
१) **अश्विनी**–वय वर्षे ११. शाळेत शिकत आहेत.
२) **मयुरा**–वय वर्षे ६. शिकत आहे. पुत्र–**विक्रम**–वय ५ वर्षे.
१६/९ **जगन्नाथ विष्णू**–जन्म १९२२ शिरपूर येथे. शिक्षण–मॅट्रिकपर्यंत. व्यवसाय–साऊथ सेंट्रल रेल्वेत इलेक्ट्रिकल चार्जमन. वास्तव्य–द्वारा 'रमा–विष्णू', गणेश हौ. सो. ब्लॉक नं. ७, गोपाळवाडी रोड, दौंड, जि. पुणे.
भार्या : **सरोजिनी**–माहेर–नलिनी सदाशिव सहस्रबुद्धे, मिरज मृत्यू १९८८.
कन्या :
१) **जयश्री**–जन्म १७ ।३ ।१९५३. मॅट्रिक, डी. एड्. सासर–जयश्री सुधाकर जोगळेकर.
२) **ज्योत्स्ना**–जन्म २२ ।९ ।१९५४. सासर–ज्योत्स्ना श्रीधर वैशंपायन.
१७/१० **जयवंत जगन्नाथ**–जन्म १० ।१० ।१९५६. इंजिनियर.
भार्या : **चारुशीला**–माहेर–चारु दिगंबर गाडगीळ.
कन्या : **नेहा**–जन्म नोव्हेंबर १९८९. पुत्र–**चेतन**–जन्म १९८३.
१८/८ **शिवराम (घारूकाका) नारायण**–मृत्यू १९५०. व्यवसाय–शेती. वास्तव्य–गावडे आंबेरे.
भार्या : **आनंदी**–माहेर–द्वारका देशमुख. पावस. मृत अपत्य नाही.
१९/७ **वासुदेव बल्लाळ**–कन्या–५.
कन्या :
१) **भागी**–माहिती मिळाली नाही.
२) **ठकी**–सासर–भिडे. वास्तव्य–विलेपार्ले.
३) **चंद्री**–सासर–परांजपे, वा. मालाड.
४) व ५) नावे माहित झाली नाहीत.
२०/८ **सखाराम वासुदेव**–जन्म १८९३. मृत्यू १९७६. शिक्षण–मराठी चौथी व्यवसाय– सुरुवातीला बोटीवर रत्नागिरी येथे पाणी भरण्याचे काम, नंतर मुंबईला म्युनिसिपालिटीमध्ये नोकरी. गांवच्या महाशिवरात्री उत्सवात हिरीरिने भाग घेत. श्रीशंकरभक्त व मांत्रिक विद्या अवगत त्यामुळे लोकप्रिय होते. नाटकात स्त्री पार्ट करण्याची आवड. वास्तव्य–अहमदसेलर बिल्डिंग, नायगांव, दादर मुंबई–१४.
भार्या : **रखमाबाई**–जन्म १९०५. माहेर–द्वारका रामचंद्र पालकर, पावस. मृत्यू १८ ।८ ।१९९०.
२१/९ **मुकुंद सखाराम**–जन्म २२ ।१ ।१९२५ मृत्यू २७ ।१२ ।१९८०. शिक्षण–मराठी ७ वी पास व्यवसाय–शेती. वास्तव्य–गोळेवाडी, बदलापूर, जि. ठाणे.
भार्या : **मालती**–जन्म १८ ।७ ।१९३०. माहेर–कुसुम शिवराम जोशी, कोळंबे. शिक्षण–मराठी ७ वी. वास्तव्य–नौपाडा, ठाणे.
कन्या :
१) **कमल**–जन्म १९६४. सासर–विजया नारायण कोल्हटकर.
२) **विनया**–जन्म १९६१. सासर–मनीषा दामोदर गाडगीळ.
३) **चंद्रकला**–जन्म १९६४. सासर–स्वाती चंद्रकांत जोशी.
२२/१० **भास्कर मुकुंद**–जन्म १९५०, शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–स्टेट बँक, चिपळूण येथे

नोकरी. वास्तव्य—मु. पो. गावडे आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
कन्या : **भक्ति**— पुत्र—**कपिल**—
२३/१० **सुरेश मुकुंद**—जन्म १३ ।८ ।१९५६. शिक्षण—एस्. एस्. सी. व्यवसाय—प्राव्हिडंट फंड ऑफिस ठाणे येथे कारकून. वास्तव्य—गोळेचाळ, रूम नं. २, बदलापूर, जि. ठाणे.
भार्या : **सुखदा**—जन्म १७ ।८ ।१९५९. माहेर—सुरेखा बर्वे, सोनगाव ता. चिपळूण, शिक्षण—एस्. एस्. सी. गृहिणी.
२४/१० **वासुदेव मुकुंद**—जन्म १८ ।७ ।१९५८. शिक्षण—बी.कॉम. व्यवसाय—नोकरी, वास्तव्य—गोळेचाळ, बदलापूर, जि. ठाणे. अविवाहित.
२५/९ **वसंत सखाराम**—जन्म २ ।१० ।१९३१. शिक्षण—एस्. एस्. सी. पर्यंत. व्यवसाय— के. ई. एम. हॉस्पिटल, परेल येथे नोकरी. वास्तव्य—सत्यनारायण पांड्ये चाळ, रूम नं. ४, सुभाषनगर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई. हल्ली वास्तव्य—गावडे आंबेरे.
भार्या : **वसुधा**—जन्म १९३४. माहेर—कावेरी विश्वनाथ गोडबोले, पावस. शिक्षण—मराठी ७ वी पास.
कन्या :
१) **शोभना**—जन्म २१ ।७ ।१९५८. शिक्षण—११ वी पास. सासर—शोभना सदानंद फडके. हल्ली वास्तव्य—कांदिवली, मुंबई.
२) **लीला**—जन्म ९ ।६ ।१९६२. शिक्षण—१० वी पास. सासर—स्मिता श्रीकांत जोशी, वायंगणी. हल्ली वास्तव्य—जोगेश्वरी, मुंबई.
३) **रेखा**—जन्म ८ ।६ ।१९६६ शिक्षण—१० वी. सासर—शलाका सदानंद जोशी. कोतवडे, रत्नागिरी.
४) **आशा**—जन्म २४ ।१२ ।१९६८. शिक्षण—१० पास. सासर—वीणा वसंत जोशी. वास्तव्य—अंधेरी, मुंबई.
५) **चित्रा**—जन्म १९ ।३ ।१९७१ शिक्षण—१० वी पास.
२६/१० **उदय वसंत**—जन्म ३० ।१२ ।१९७२. शिक्षण—चालू आहे. वास्तव्य—जोगेश्वरी, मुंबई.
२७/९ **मधुकर सखाराम**—जन्म १ ।१ ।१९३७ शिक्षण—एस्. एस्. सी. पर्यंत (डिप्लोमा इन ऑप्थलमॉलॉजी) व्यवसाय—के. ई. एम. हॉस्पिटल मध्ये नोकरी. वास्तव्य—सत्यनारायण पांडे चाळ, रु. नं. ४, सुभाषनगर, जोगेश्वरी पूर्व, मुंबई—६०.
भार्या : **मंगला**—जन्म १ ।१० ।१९४२. माहेर—नलिनी महादेव देसाई, मिठगवाणे, ता. राजापूर. शिक्षण—पी. एस्. सी. गृहिणी.
कन्या :
१) **भारती**—जन्म १९६६. सासर—भारती भरत मोघे, मालाड, मुंबई.
२) **अंजनी**—जन्म १९६९.
२८/१० **बल्लाळ मधुकर**—जन्म १ ।६ ।१९६३. शिक्षण—१२ वी (सायन्स) पास. व्यवसाय— भिक्षुकी व शेती. वास्तव्य—गावडे आंबेरे.
२९/१० **रमेश मधुकर**—जन्म ७ ।८ ।१९६७. शिक्षण—९ वी पर्यंत. व्यवसाय—पोस्टमन, शेती, भिक्षुकी. वास्तव्य—गावडे आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
३०/९ **जगन्नाथ सखाराम**—जन्म २२ ।६ ।१९४०. शिक्षण—फायनल ७ वी. व्यवसाय—शेती. वास्तव्य—गावडे—आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
भार्या : **रोहिणी**—जन्म २६ ।२ ।१९४७. माहेर—सुलभा केशव जोशी, देवरुख, जि. रत्नागिरी.
३१/१० **प्रल्हाद जगन्नाथ**—जन्म २६ ।१ ।१९६८. शिक्षण—एस्. एस्. सी पर्यंत.
३२/१० **पुरुषोत्तम जगन्नाथ**—जन्म ६ ।६ ।१९७२. शिक्षण—एस्. एस्. सी.
३३/८ **यशवंत वासुदेव**—लहानपणी मृत.
३४/८ **शंकर वासुदेव**—लहानपणी मृत.
३५/८ **महादेव वासुदेव**— #
कन्या :
१) **तारी**—सासर—मालती दामोदर जोशी, पावसजवळ (नाखरे). मृत.
२) **शांती**—सासर—रमाबाऊ शंकर रानडे, मृत.
३६/८ **मोरेश्वर वासुदेव**—मृत्यू १३ ।१ ।१९६१. शिक्षण—व्ह. फा. व्यवसाय—खानदेशमध्ये शिक्षकाची नोकरी. नंतर पालघर येथे श्री. रघुनाथराव दांडेकर यांचेकडे कारकून म्हणून नोकरी.
भार्या : १) **यमुना**—माहेर—दांडेकर.
कन्या :
१) **इंदू**—सासर—यशवंत त्रिंबक विद्वांस, भिवंडी. यांची


पत्नी.
२) **सुशिला**–सासर–कुलकर्णी, सांताक्रूझ. मुंबई.
३७/९ **विनायक मोरेश्वर**–जन्म १५ ।७ ।१९१५. मृत्यू ८ ।८ ।१९८६. शिक्षण–बी. ए. व्यवसाय–पर्सनल इस्पेक्टर, वेस्टन रेल्वे, लोअर परेल येथे नोकरी.
भार्या : **मालती**–माहेर–मालती चिंतामणी जोशी, पुणे.
कन्या :
१) **नलिनी**–जन्म १९४२. शिक्षण–बी. ए. हिंदी पंडित. सासर–सुमन मोरेश्वर चक्रदेव, विलेपार्ले, मुंबई.
२) **ललिता**–जन्म १९४९. शिक्षण–बी. ए. बी. ए. सासर–सिमंतिनी सदाविजय करंदीकर, बोरिवली, मुंबई.
३) **नीलीमा**–जन्म १९५५. शिक्षण–बी. एस्सी. सासर–अंजली सुरेश भिडे, ठाणे.
३८/१० **रामकृष्ण विनायक**–जन्म २९ ।११ ।१९५०. शिक्षण–बी. एस्सी. (ऑनर्स). व्यवसाय–खाजगी नोकरी. वास्तव्य–२ ।४६ भक्तियोग सोसायटी, परांजपे नगर, वझीरा नाका, लो. टिळक रोड, बोरिवली (प.) मुंबई.
भार्या : **स्मिता**–बी. ए. बी. एड्. माहेर–लतिका मोरेश्वर जोशी, पुणे.
कन्या : **सुषमा**–जन्म ७ ।२ ।१९७९ शिकत आहे.
पुत्र–**स्वानंद**–जन्म १२ ।४ ।१९८५ शिकत आहे.
३९/१० **दिलीप विनायक**–जन्म १९४५. मृत्यू १९४९.
४०/६ **धोंडोपंत गणेश**–जन्म अंदाजे १८८६. मृत्यू ८ ।११ ।१९४६. शिक्षण–व्ह. फा. व्यवसाय–श्री. देवधर वकीलांकडे कारकुनाची नोकरी. वास्तव्य–मु. पो. शिरपूर जिल्हा – धुळे (पूर्वीचा पश्चिम खानदेश).
भार्या : **राधाबाई**–मृत्यू १९६६. माहेर–मनुताई प्रभाकर जोशी. मधली आळी, रत्नागिरी.
**कन्या : इंदुमती**–सासर–देवधर, मु. पडेल. ता. देवगड.
४१/७ **रघुनाथ धोंडोपंत**–जन्म ३० ।१२ ।१९२१, शिरपूर. शिक्षण–पूर्वीची मॅट्रिक नापास. व्यवसाय–सरकारी नोकरी. वरळी डेअरीमधून १ जानेवारी १९८० रोजी सेवानिवृत्त. सामाजिक कार्यात रस. १) जेष्ठ नागरिक संघ, कल्याण, खजिनदार २) ब्राह्मण सभा, कल्याण, कार्यकारी मंडळात सदस्य ३) गणपती मंदिर, बाजारपेठ देवस्थान येथे विश्वस्त. नेपाळ, संपूर्ण भारत व अंदमान येथे प्रवास केला.



श्री. रघुनाथ धोंडो व सौ. नलिनी रघुनाथ

वास्तव्य–राम मारूती रोड, डॉ. सुरेश फडके वाडा, आळी नं. २, घर नं. २६, दिवाण बावडी जवळ, कल्याण ४२१३०१.
भार्या : **नलिनी**–जन्म ६ ।९ ।१९२८. विवाह २८ ।२ ।१९४६. माहेर–शांताबाई सीताराम गोडबोले. मु. खोल ता. देवगड, सिंधुदुर्ग शिवणकाम, भरतकाम व इतर कलांच्या सर्व परीक्षा उत्तीर्ण. तसेच रेगझीनच्या बॅग्ज बनविणे इत्यादि व्यवसाय. अपत्य नाही.
४२/७ **बाळकृष्ण धोंडोपंत**–जन्म २५ ।९ ।१९२५ शिरपूर येथे. शिक्षण–नॉन मॅट्रिक. व्यवसाय– वेस्टर्न इंडिया मिलमध्ये नोकरी. आता सेवानिवृत्त. सेवानिवृत्तीनंतर बदलापूर येथे चालविण्यात येणाऱ्या वृद्धाश्रमात व्यवस्थापक म्हणून काम बघत होते. वास्तव्य–डॉ. सुरेश फडके वाडा, आळी नं. २ घर नं. २६, दिवाण बावडी जवळ, राम मारूती रोड, कल्याण–४२१३०१.
भार्या : **सुमति**–माहेर–छबुताई महादेव दाबके, आगाशी. मृत्यू १९६६.
कन्या : **धनश्री**–जन्म १४ ।९ ।१९५७. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–बॉम्बे पोर्ट ट्रस्ट. मध्ये नोकरी. सासर–धनश्री सुरेश जोशी. पळनीटकर वाडा, आगलावे आळी, कल्याण.
४३/८ **श्रीराम बाळकृष्ण**–जन्म २२ ।३ ।१९६३. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– प्रथम गारलीक इंजि. कंपनीत नोकरी. नंतर मध्य रेल्वेत नोकरी. शरीर सौष्ठव स्पर्धेत प्राविण्य दाखवून भारतात दुसरा–रौप्य पदक

## गावडे आंबेरे घराणे क्रमांक ३
## गावडे आंबेरे–महू–पुणे




प्राप्त. पश्चिम भारत स्पर्धेत द्वितीय क्रमांक–रौप्य पदक प्राप्त अशी अनेक पदके पटकावली.
भार्या : **संपदा**–माहेर–कर्वे. पालघर जि. ठाणे.
४४/७ **सदानंद धोंडो**–जन्म २२ ।७ ।१९२९.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–पश्चिम रेल्वेत पर्सनल डिपार्ट. मधून सेवानिवृत्त. वास्तव्य– डॉ. सू.य. फडके वाडा, आळी नं. २, घर नं. २६, दिवाण बावडी जवळ, राम मारूती रोड, कल्याण.
भार्या : **शैलजा**–माहेर–लीला विनायक आपटे, जोगळेकरवाडा, सिद्धेश्वर आळी, कल्याण. निवृत्त शिक्षिका.
४५/८ **संजीव सदानंद**–जन्म १८ ।१ ।१९५६.
शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–सारस्वत को. ऑप. बँकेत नोकरी.
भार्या : १) **मुग्धा**–नोकरी बडोदा बँक, फोर्ट, मुंबई येथे. माहेर–उज्ज्वला गजानन दामले, दाभोळ ता. दापोली.
कन्या : **दिप्ती**–जन्म २ ।९ ।१९८६.
४६/६ **हरि गणेश**–मुंज होऊन लहानपणीच वारले.


# गावडे आंबेरे घराणे क्रमांक ३

## गावडे आंबेरे–महू–पुणे.

१/१ **विठ्ठल**– #
कन्या :
१) **नर्मदा**– #
२) **गंगू**– #
२/२ **मोरेश्वर विठ्ठल**– #
३/३ **विश्वनाथ मोरेश्वर**–मृत्यू १९७२.
व्यवसाय–टेलिफोन एक्सचेंजमध्ये मॉनिटर. वास्तव्य–महू (म.प्र.)
भार्या :**लीलावती**–माहेर–लीलावती गोविंद गोखले.
कन्या :
१) **कुसुम**–सासर–कुसुम पुरुषोत्तम ठिपसे. वास्तव्य–१५ ए, गौतमनगर, भोपाळ.
२) **जयश्री**–सासर–जयश्री श्रीपाद नवरे. वास्तव्य–१७,

शास्त्रीनगर, भंडारा, महाराष्ट्र.
३) **ललिता**–सासर–ललिता सुनिल मोघे.
शिक्षण–एम्. ए. बी. एड्. व्यवसाय–शिक्षिका.
वास्तव्य–सरस्वती कॉलनी, देवपूर, धुळे.
४) **माधुरी**–शिक्षण–बी. ए. सासर–माधुरी बाळकृष्ण सोहनी. पति–आर्मीत लेफ्टनंट कर्नल. वास्तव्य–२६ ए, एम्. आय. जी. कॉलनी, इंदिरानगर, रतलाम. (म.प्र.)
४/४ **मोहन विश्वनाथ**–जन्म १० ।११ ।।१९४९, महू. शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–स्टेट बँक ऑफ इंदूर, महू (म.प्र.). वास्तव्य–२३१६, महाराष्ट्र समाज पथ, लुनियापुरा, महू (म.प्र.). स्वत:चे घर आहे.
भार्या : **कुमुद**–माहेर–कुमुद कुलकर्णी, इंदूर.
५/५ **अभिजित मोहन**–जन्म ५ ।४ ।१९८०. विद्यार्थी.
६/४ **सुरेश विश्वनाथ**–जन्म २० ।८ ।१९४४.
शिक्षण–एम्. ए. एल्‌एल्. बी. व्यवसाय–रेल्वेत हेड बुकिंग क्लार्क, इंदूर. वास्तव्य–राजेंद्रनगर, इंदूर.
भार्या : **हेमा**–माहेर–हेमा भाटे, जुनी इंदूर (म.प्र.)
७/५ **सौरभ सुरेश**–जन्म १४ ।६ ।१९७४.
शिक्षण–इयत्ता १० वीत शिकत आहे.
८/५ **स्वप्नील सुरेश**–जन्म १९ ।८ ।१९७६ शिकत आहे.
९/४ **जयंत विश्वनाथ**–जन्म १७ ।६ ।१९५२.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–इंदूर परस्पर सह. बँक लि. इंदूर येथे नोकरी. वास्तव्य–२३१६ महाराष्ट्र समाज पथ, महू. मध्य प्रदेश.
भार्या : **उज्ज्वला**–माहेर–उज्ज्वला गोखले.
कन्या : **हर्षदा**–जन्म १९८८.
१०/४ **विकास विश्वनाथ**–जन्म ८ ।७ ।१९६५.
शिक्षण–बी. कॉम. व्यवसाय–न्यू इंडिया अॅशुरन्स कं. इंदूर येथे नोकरी. तबला वाजवण्याची आवड.
वास्तव्य–विमानगर, इंदूर.
११/३ **काशीनाथ मोरेश्वर**–मृत्यू ऑक्टोबर १९८८.
व्यवसाय–खाजगी एजन्सी. वास्तव्य–तांबे बोळ, नारायण पेठ, पुणे.
कन्या : **हेमा**–सासर–हेमा सुभाष लेले. २८४ शनवार पेठ, पुणे. नाटकांत काम करणे, दिग्दर्शन, लेख लिहिणे इ. ची आवड व ब्यूटी पार्लर.
१२/२ **गंगाधर विठ्ठल**–जन्म १९०१. मृत्यू १९७० कुर्धे येथे. शिक्षण–शालेय शिक्षण महू येथे झाले. नंतर गावडे आंबेरे येथे आले. व्यवसाय–दुकानात नोकरी. वास्तव्य–गावडे आंबेरे. जि. रत्नागिरी.
भार्या : **उमाबाई**–माहेर–भागिरथी काळे–महाजन गावखडी, रत्नागिरी.
कन्या :
१) **आवडी**–वय ६८. सासर–मनोरमा मोरेश्वर पाटणकर, रत्नागिरी.
२) **काशी**–वय ६२. सासर–वसुंधरा राजाराम करंदीकर मिरजोळे, रत्नागिरी.
३) **नमू**–वय ६०. सासर–सुधा मोरेश्वर रिसबूड कांदेवाडी, गिरगांव. मुंबई–४.
१३/३ **माधव गंगाधर**–जन्म ३ ।३ ।१९३९. गावडे आंबेरे. शिक्षण–एस्. एस्. सी. व्यवसाय– डी.एस्.पी. ऑफिस, रत्नागिरी येथे नोकरी. वास्तव्य–३००१ टिळक आळी, रत्नागिरी.
भार्या : **मीनाक्षी**–माहेर–चंपाकळी नारायण पेठे, मोंड, ता. देवगड.
१४/४ **संदिप माधव**–जन्म ८ ।४ ।१९७६.
शिक्षण–इयत्ता ८ वीत शिकत आहे.
१५/४ **मनोज माधव**–जन्म २ ।४ ।१९७७.
शिक्षण–इयत्ता ७ वीत शिकत आहे.
१६/३ **महादेव (बापू) गंगाधर**–जन्म १९३५.
शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–स्टेट ट्रान्सपोर्टच्या राजापूर डेपो येथे नोकरी. वास्तव्य–मु.पो. गावडे आंबेरे, ता. जि. रत्नागिरी.
भार्या : **विजया**–माहेर–शारदा आत्माराम जोशी, बसणी, रत्नागिरी.
कन्या :
१) **निर्मला**–जन्म १२ ।४ ।१९६८. शिक्षण–बी.कॉम. सासर–निर्मला नागेश केळकर, रत्नागिरी.
२) **मंगला**–जन्म ३० ।६ ।१९७०. शिक्षण–१२ वीत शिकत आहे.
१७/४ **प्रदिपकुमार महादेव**–जन्म ९ ।२ ।१९६६.
शिक्षण–बी. कॉम.
१८/२ **गजानन विठ्ठल**– #
१९/२ **गणेश विठ्ठल**– #


## घराणे क्रमांक ४
## वंशावळी क्रमांक १
## गावडे आंबेरे–नेऊरगाव–औरंगाबाद



घराणे क्रमांक ४

वंशावळी क्रमांक-१

गावडे आंबेरे–नेऊरगाव–औरंगाबाद




## गावडे आंबेरे घराणे क्रमांक ४


### वंशावळी क्रमांक १

### गावडे आंबेरे–नेऊरगाव–औरंगाबाद

१/१ **शंकर**–हा या घराण्याचा ज्ञात मूळ पुरुष.
२/२ **बाबदेव शंकर**– #
३/३ **मोरेश्वर बाबदेव**– #
४/४ **बल्लाळ मोरेश्वर**– #
५/५ **नारायण बल्लाळ**–जन्म १८५९ राधापूर येथे. मृत्यू–१९५८.
भार्या : **सावित्रीबाई**–माहेर–मथूताई देशमुख. पावस, जि. रत्नागिरी.
कन्या :
१) **सखूताई**–सासर–कुशाताई गोपाळ फडके.
२) **कुसुमताई**–सासर–सखूताई केशवराव जोशी.
३) **सोनूताई**–सासर–दामले.
६/६ **दत्तात्रय नारायण**–जन्म १८८०. मृत्यू १९३२.
भार्या : **रखमाबाई**–माहेर–जोशी पिंपरीकर.
कन्या : **मैनाताई**–सासर–दामले.
७/७ **गजानन दत्तात्रय**–जन्म १९१७. मृत्यू १९५६. व्यवसाय–शेती. नेऊरगाव शिवाय देवळाली येथे कॅन्टीनचा व्यवसाय होता.
भार्या : **सुलभा**–जन्म १९२६. माहेर–सुंदर विश्वनाथ

आठवले, नागांव, ता. अलिबाग शिक्षण—५ वी (मराठी) वास्तव्य—पाठक निवास, श्रीनिकेतन, औरंगाबाद.
कन्या :
१) **कोमला**—जन्म १९४७. शिक्षण—मॅट्रिक.
सासर—वर्षा अनिल जोशी, बदलापूर.
२) **आशा**—जन्म १९५२. शिक्षण—मॅट्रिक
सासर—आशा अरूण नेने, नाशिक.
८/८ **सुहास गजानन**—जन्म १९४५. शिक्षण—बी.ए. व्यवसाय—शेती.
भार्या : **संजीवनी**—माहेर—शालिनी गोविंद डोंगरे, पुणे. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—नोकरी.
कन्या :
१) **प्राजक्ता**—जन्म १ ।५ ।१९७६. शिकत आहे.
२) **प्राची**—जन्म १९७९. शिकत आहे.
९/९ **आशिष सुहास**—जन्म १९७९. शिकत आहे.
१०/८ **प्रकाश गजानन**—जन्म १९४९. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—कॉन्ट्रॅक्टर.
भार्या : **प्रिया**—माहेर—निर्मला टंडण.
कन्या : **पल्लवी**—जन्म १९७७.
११/९ **प्रसाद प्रकाश**—जन्म १९८०. विद्यार्थी.
१२/७ **प्रभाकर दत्तात्रय**—लहानपणी मृत्यू.
१३/७ **अनंत दत्तात्रय**—जन्म ७ ।१ ।१९२२. मृत्यू २६ ।६ ।१९७८. शिक्षण—मराठी ७ वी. व्यवसाय—शेती.
भार्या : **प्रभावती**—जन्म १९२७. माहेर—प्रभा हरी कानडे, औरंगाबाद. वास्तव्य—वैद्य वाडा, सरस्वती कॉलनी, औरंगाबाद ४३१००१.
कन्या :
१) **निशा**—जन्म २७ ।५ ।१९५२. शिक्षण—बी.ए.
सासर—हेमलता दिलीप मोडक, औरंगाबाद.
२) **शैला**—जन्म १९ ।१ ।१९५६. सासर—दीपा प्रदिप ओक. मुंबई.
३) **छाया**—जन्म २६ ।१ ।१९५८. शिक्षण—बी.कॉम्. सासर—छाया विजय काळे, हैद्राबाद.
४) **सीमा**—जन्म २८ ।१ ।१९६५. शिक्षण—एम्.कॉम्. व्यवसाय—नोकरी.
१४/८ **विश्वास अनंत**—जन्म १९५४. मृत्यू १९५६.

१५/७ **दिवाकर दत्तात्रय**—जन्म २२ ।८ ।१९३०. शिक्षण—बी. एस्सी. (ॲग्रिकल्चर) व्यवसाय—शेती सल्लागार विनायक सहकारी साखर कारखाना लि. मधें विकास अधिकारी. वास्तव्य—२२७, समर्थनगर, औरंगाबाद.



कै. सौ. शुभदा दिवाकर

भार्या : **शुभदा**—माहेर—विजया नारायण फडके, पुणे. मृत्यू ८ ।२ ।१९९०.
कन्या : **संध्या**—जन्म १९५९. मृत्यू १९८४.
१६/८ **मकरंद दिवाकर**—जन्म २५ ।९ ।१९६०. शिक्षण—बी.कॉम. व्यवसाय—हैद्राबाद येथें दूध डेअरी चालवितात.
भार्या : **सुनिती**—माहेर—सुनिती वसंत वझे. टे. टेनिस चॅंपियन. चार महिने अमेरिकेत वास्तव्य. अ-५ उषाकिरण, लल्लूभाई पार्क समोर, अंधेरी (प.) मुंबई.
कन्या : **कल्पिता**—जन्म १६ ।३ ।१९८९.
१७/८ **मिलींद दिवाकर**—जन्म २३ ।३ ।१९६४. शिक्षण—१२ वी पास. व्यवसाय—औरंगाबाद येथें हॉटेल बांधकाम व इमारत बांधकामाचा व्यवसाय. वास्तव्य—सत्यकृपा, ३ शिवाजी कॉलनी त्रिवेणी प्रोव्हिजन व जनरल स्टोअर्सचे वर, क्रांती चौक पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद—१.
१८/६ **मोरेश्वर नारायण**—लहानपणी मृत्यू.

१९/६ **सीताराम नारायण**– #
भार्या : **जानकीबाई**–माहेर–धारप.
कन्या :
१) **सोनूताई**–सासर–वझे, बीड.
२) **काशीताई**–सासर–ठोसर, अलिबाग.
२०/७ **पुरुषोत्तम सीताराम**–अविवाहित.
२१/७ **कमलाकर सीताराम**– #




श्री. प्रल्हाद सीताराम व सौ. सुशीला प्रल्हाद

२२/७ **प्रल्हाद सीताराम**–जन्म १९१९ नेऊर गांव येथे. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून तरुण वयात कामास सुरुवात केली. उपजिविकेचे साधन म्हणून गिरगांव, मुंबई येथील श्री. विठोबा शेठ अभ्यंकर यांची टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट कांही वर्षे चालवावयास घेतली. पुढे हैद्राबाद संस्थानातील रझाकार चळवळीत भाग. त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. रा.स्व.संघाच्या बंदी काळांतही तुरूंगवास पत्करावा लागला. १९८० ते १९८८ पर्यंत रा.स्व.संघाचे महाराष्ट्र प्रांत संघचालक होते. नंतर सहं–प्रांत संघचालक म्हणून काम करतात. इंग्रजी लघुलिपीवर एक पुस्तक लिहिले.
वास्तव्य–'स्वागत', नवीन उस्मानपुरा, औरंगाबाद.
भार्या : **सुशीला**–जन्म १९ ।१० ।१९२९.
शिक्षण–बी.ए; बी.एड्. रेल्वेच्या को. ऑ. क्रेडिट सोसायटीत नोकरी. १९७५ ते १९८७ पर्यंत औरंगाबाद येथे शिक्षिका. माहेर–विजया श्रीधर साठे, वाई.
कन्या :
१) **बिंदा**–जन्म ३० ।८ ।१९५९. शिक्षण–बी.कॉम्. सासर–प्रज्ञा गजानन साठे. औरंगाबाद.
२) **वृंदा**–जन्म २० ।८ ।१९६४. शिक्षण–एम्.एस्सी. सासर–वृंदा गिरीश (यशवंत) टिळक. १२ साईकृपा, चौधरी हॉस्पिटलसमोर, घन:श्याम गुप्ते रोड, डोंबिवली (प.).
२३/८ **जयंत प्रल्हाद**–जन्म रंगपंचमी २६ मार्च १९५१. शिक्षण–बी.एस्सी., एलूएल्.बी. व्यवसाय–सारस्वत को. ऑप. बँकेत अकाऊंटंट. वास्तव्य–'स्वागत' न्यु उस्मानपूरा, डार्लिंग हॉटेलच्या मागे, अन्नपूर्णाजवळ, औरंगाबाद ४३१००५५.
भार्या : **मंजिरी**–माहेर–चित्रा श्रीराम आधारकर, कल्याण.
कन्या : **माधवी**–जन्म ५ ।५ ।१९८२. शिकत आहे.
पुत्र–**अनिरुद्ध**–जन्म ३ ।५ ।१९८९.
२४/८ **अजय प्रल्हाद**–जन्म ३ ।५ ।१९५३.
शिक्षण–बी.ए. व्यवसाय–प्रथम साबणाचा कारखाना होता. वडिलांच्या तुरूंगवासाचे काळांत शेतीकडे लक्ष दिले. सध्या औरंगाबाद येथे जनरल स्टोअर्सचे दुकान व शेती. वास्तव्य–नेऊरगाव.
भार्या : **अनुराधा**–माहेर–हेमलता मोडक. माधवनगर, सांगली.
कन्या :
१) **अनुया**–जन्म १९ ।१२ ।१९८३.
२) **अस्मिता**–जन्म ३१ ।१० ।१९८७.
२५/६ **लक्ष्मण नारायण**–जन्म १२ ।१२ ।१९१२ नेऊरगांव येथे. शिक्षण – बी.ए. व्यवसाय–इमारती, रस्ते, धरणे, कालवे, लष्करी विमानतळ, लाकडी फर्निचर इ. चे कंत्राटदार आणि वंशपरंपरागत शेती. सतत कामात व्यग्र रहाणे आणि आध्यात्मिक वाचनाची आवड. सामाजिक कार्यात खूप रस व सहभाग. विवेक वर्धिनी शिक्षण संस्था, हैद्राबाद या संस्थेत अनेक वर्षे खजिनदार व कार्यकारी मंडळ सदस्य, महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद आणि मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद येथे आजीव सभासद व अनेक वर्षे कार्यकारी मंडळ सदस्य. विवेक वर्धिनी शिक्षण संस्थेच्या कॉलेज स्थापनेत महत्वाचा सहभाग. सन १९६२ ते १९६५ या काळात श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेचे अध्यक्षपद सांभाळले. त्याशिवाय भारत मुद्रक,

प्रकाशक, औरंगाबाद या संस्थेचे बरीच वर्षे कार्यकारी मंडळ सदस्य व काही काळ अध्यक्ष. मराठवाडा या पत्राचे संस्थापकांपैकी एक कै. आ. कृ. वाघमारे यांचे विश्वसनीय सहकारी व त्यांच्या विश्वस्त मंडळाचे बरीच वर्षे सदस्य व अध्यक्ष. कै. आ. कृ. वाघमारे साहेब आणि कै. रामानंद तीर्थ यांचे विश्वसनीय सहकारी आणि त्यामुळे स्वातंत्र्यचळवळीशी अतिशय जवळचा संबंध. काँग्रेससह सर्व राजकीय पक्ष व कार्यकर्ते याना सक्रीय सहकार्य. आर्थिक सहाय्य. स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्याचा किंवा संबंधाचा पुढील आयुष्यात मनाच्या विशिष्ट ठेवणीमुळे कधीही उपयोग करून घेतला नाही. कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता चालत आलेले मानपत्र आणि स्वातंत्र्य सैनिक वेतन नाकारले. वास्तव्य — प्लॅट नं. ३, मीरा निकेतन, ८३५/२ कुतबीगुडा, हैद्राबाद (आंध्र प्रदेश) पिन — ५०० ०२७.
भार्या : १) **रमाबाई**–माहेर–पळनीटकर. २) **रमाबाई**–माहेर–मीराबाई शिवराम सहस्त्रबुध्दे ५६३, शनिवार पेठ, पुणे–३०.
कन्या :
१) **रजनी**–जन्म अनंतचतुर्दशी, सन १९४२. शिक्षण–बी.ए. सासर– मृणालिनी न. भिडे. श्रीरामपूर.
२) **श्यामला**–जन्म १९४६. शिक्षण–बी.एस्सी. सासर–शैलजा स. वैद्य. बीड.
२६/७ **अरविंद लक्ष्मण**– जन्म ३.१०.१९४०. शिक्षण–बी.ए. व्यवसाय–वडिलांचा बिल्डरचा व कंत्राटदारीचा धंदा. वास्तव्य–मीरा निकेतन ३ ।३ ।८३५ ।२ कुतबीगुडा. हैद्राबाद. (आंध्रप्रदेश).
भार्या : **अनघा**–शिक्षण–बी.ए. माहेर–नीला भालचंद्र करमरकर मु. पो. हरेगांव (बोलापूर साखर कारखाना) रा. श्रीरामपूर. हल्ली माहेरचे ठिकाण, कर्वेरोड, पुणे.
कन्या :
१) **गीतांजली**–जन्म १९७३. इ. १२ वीत शिकत आहे.
२) **अबोली**–जन्म १९७६. इ. ९ वीत शिकत आहे.
२७/८ **अभिजित अरविंद**–जन्म १९८२. शिकत आहे.
२८/५ **दिनकर बल्लाळ**–मृत्यू १९४०.
कन्या :
१) **वारणा**–सासर–गोखले.
२) **चिमा**–सासर–बर्वे.
२९/६ **गणपत दिनकर**–जन्म १८९७. मृत्यू १९७७. व्यवसास–शेती.
भार्या : १) **सरस्वती**–माहेर–सहस्त्रबुध्दे. २) **शांता**–माहेर–नामजोशी.
कन्या :
१) **मंगल**–सासर–दामले, अलिबाग.
२) **लीला**–सासर–नेने, पार्ले, मुंबई.
३) **पुष्पा**–सासर–केळकर, बदलापूर.
४) **तारा**–सासर–नातू.
५) **प्रमिला**–लहानपणी मृत्यू.
३०/७ **सुधीर गणपत**–जन्म आश्विन शुध्द प्रतिपदा सन १९४५. शिक्षण–एस्.एस्.सी. व्यवसाय–शेती. वास्तव्य–'कल्पित' ८ राधामोहन कॉलनी, औरंगाबाद. उत्कृष्ट नकलाकार, नाटकात कामे करतात.
भार्या : **सुषमा**–माहेर–शैलजा श्रीधर बापट, म्हैसमाळ.
कन्या :
१) **जयंती**–जन्म ३ ।२ ।१९७१. इ. १२ वीत शिकत आहे.
२) **योगिनी**–जन्म २३ ।११ ।१९७३. इ. ९ वीत शिकत आहे.
३१/६ **शंकर दिनकर**– जन्म १९०५. मृत्यू १६ ।९ ।१९८६. व्यवसाय–शेती.
भार्या : **उमाबाई**–माहेर–सुंदर शंकर कानिटकर.
कन्या :
१) **प्रमोदिनी**–सासर–उषा विनायक जोशी, चौल.
२) **कुंदा**–सासर–मेघना चंद्रकांत कुंटे, उरण.
३) **सुशीला**–लहानपणी मृत्यू.
३२/७ **मधुकर शंकर**–जन्म २६ ।११ ।१९३४ नेऊरगांव. शिक्षण–९ वी पास. व्यवसाय–एम्.एस्.आर.टी.सी. (स्टेट ट्रान्सपोर्ट) मध्ये नोकरी. वास्तव्य–सारंग सोसायटी, शुभम् बंगला, गजानन महाराज मंदिराजवळ, गारखेडा, औरंगाबाद.
भार्या : **निर्मला**–माहेर–कुसुम विनायकराव परचुरे.
कन्या :
१) **माधुरी**–वय वर्षे ३१. सासर–माधुरी विनायक लेले.
२) **मोहिनी**–वय २७ वर्षे. सासर–मनिषा अजित भिडे, हडपसर.

३) **मालती**–वय २६ वर्षे. सासर–श्रध्दा उल्हास जोशी, पुणे.
३३/८ **श्रीधर मधुकर**–जन्म १९६६.
३४/७ **जगदीश शंकर**–जन्म २० ।८ ।१९४४ शिक्षण–एम्.ए., बी.जे., डिप. इन् मॅनेजमेंट, डिप्लोमा इन् लायब्ररी. व्यवसाय–मराठवाडा विद्यापीठात वरिष्ठ सहाय्यक वृत्तपत्रलेखन, ललित लेखन नाटकात कामे, किंगमेकर म्हणून ख्याती. वास्तव्य–६० कांचननगर हौ. सोसायटी, नक्षत्रवाडी, औरंगाबाद ४३१००५.
भार्या : **अनिता**–जन्म १९५२. माहेर–हिरा मोरेश्वर रानडे. शिक्षण–एस्.एस्.सी.
कन्या : **ज्योती**–जन्म ४ ।३ ।१९७०. शिक्षण–बी.कॉम् सेकंड ईयर.
३५/८ **जितेंद्र जगदीश**–जन्म १९ ।५ ।१९७२. शिक्षण–११ वीत शिकत आहे.
३६/७ **विलास शंकर**–जन्म १० ।९ ।१९४४. शिक्षण–बी.कॉम्. एल्.एल्.बी. व्यवसाय–वकिली वास्तव्य–अंबादास जोशी वाडा, केळीबाजार, औरंगाबाद.
भार्या : **शिल्पा**–जन्म २३ ।९ ।१९५३. माहेर–सुरेखा आमडेकर.
कन्या :
१) **कपीला**–जन्म १२ ।९ ।१९७६. इयत्ता ७ वीत शिकत आहे.
२) **जुईली**–जन्म १६ ।१२ ।१९७७. इयत्ता ६ वीत शिकत आहे.
३७/७ **विजय शंकर**–जन्म २५ ।८ ।१९५३. शिक्षण–बी.एस्सी. (केमिस्ट्री) व्यवसाय–नोकरी वास्तव्य–द्वारा बी.व्ही. कुलकर्णी प्लॉट नं. ११ (ए), राधामोहन कॉलनी, खोकडपुरा, औरंगाबाद.
भार्या : **वैभवी**–माहेर–लता विनायक जोशी.
३८/८ **सुदीप विजय**–जन्म १७ ।६ ।१९८०. इयत्ता ४ थीत शिकत आहे.
३९/८ **सुजित विजय**–जन्म २१ ।४ ।१९८६
४०/६ **महादेव दिनकर**–जन्म ६ ।६ ।१९०८. मृत. व्यवसाय–बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर, साबण कारखाना. वास्तव्य–औरंगाबाद.
भार्या : १) **तारा**–माहेर–केळकर. मृत. २) **लीला**–माहेर–शकुंतला शंकर जोशी.
कन्या : **सुनेत्रा**–जन्म २ ।६ ।१९५६. श्रीरामपूर. शिक्षण–बी.ए. सासर–सुनेत्रा प्रकाश बर्वे.
४१/७ **रवींद्र महादेव**–जन्म १९ ।७ ।१९५३ श्रीरामपूर. शिक्षण–एस्.एस्.सी. आय.टी.आय. (वेल्डर) व्यवसाय–स्वत:चा रिक्षेचा व्यवसाय वास्तव्य–कल्पित, ८ राधामोहन कॉलनी, खोकडपुरा, औरंगाबाद ४३१००१.
कन्या : **केतकी**–जन्म १४ ।४ ।१९७८. शिक्षण–५ वीत शिकत आहे.
४२/८ **महेन्द्र रवींद्र**–जन्म १७ ।१२ ।१९८१. शिक्षण–२ रीत शिकत आहे.
४३/६ **गोपाळ दिनकर**–जन्म १९१५ नेऊरगांव. व्यवसाय–शेती. वास्तव्य–करवंदे वकिलांचा वाडा, हायकोर्टासमोर, नेवासा.
भार्या : **सिंधु**–माहेर–सिंधु नारायण केतकर.
कन्या : **मीना**–सासर–मीना सीताराम बर्वे, ठाणे.
४४/७ **अविनाश गोपाळ**–जन्म ११ ।५ ।१९४४. शिक्षण–एस्.एस्.सी. व्यवसाय–मुकुंद आयर्न अँड स्टील कंपनीत कळवा येथे नोकरी. वास्तव्य–विकास बिल्डींग, भंडार आळी, प्रभात सिनेमासमोर, ठाणे ४००६०१.
भार्या : **अपर्णा**–माहेर–रजनी सदाशिव फाटक.
४५/८ **उदयराज अविनाश**–जन्म ३ ।१२ ।१९७४.
४६/६ **विठ्ठल दिनकर** जन्म १९१८. मृत्यू ५ ।३ ।१९८८. इतर माहिती मिळाली नाही.
भार्या : **शालिनी**–माहेर–शकुंतला गोविंद केतकर.
कन्या :
१) **सुधा**–जन्म १९५२. सासर–पद्मा नरहरी भागवत, नाशिक.
२) **विजया**–जन्म १९५३. सासर–वैशाली सुधाकर गाडगीळ, नाशिक.
३) **सुरेखा**–जन्म १९५७. सासर–कविता कालिदास गोळे, नांदगाव.
४) **वसुमती**–जन्म जून १९६५.
४७/७ **प्रदिप विठ्ठल**–लहानपणी मृत्यू.
४८/७ **शाम विठ्ठल**–जन्म २४ ।६ ।१९६०. शिक्षण–बी.एस्सी. व्यवसाय–कृषी पर्यवेक्षक

### घराणे क्रमांक ४
### वंशावळी क्रमांक २
### गावडे आंबेरे–मुंबई




वास्तव्य—द्वारा म. दि. अभ्यंकर, 'कल्पित' राधामोहन कॉलनी, खोकडपुरा, औरंगाबाद.
४९/७ **मुकंदा विठ्ठल**–जन्म १ ।८ ।१९६३.
शिक्षण—बी.एस्सी. व्यवसाय—महिको, जालना येथे नोकरी.
५०/७ **किशोर विठ्ठल**– #
५१/६ **विष्णू दिनकर**–जन्म १९१९. मृत्यू १९८९.
व्यवसाय—स्वतंत्र टाईपरायटर खरेदी, दुरूस्ती, विक्री.
वास्तव्य—५६ एफ् मालिनी ब्लॉक्स, तात्या घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई ४००००४.
भार्या : **इंदुमती**–माहेर—इंदुमती नारायण शौचे, नाशिक.
५२/७ **शंतनु विष्णू**–जन्म २४ ।१ ।१९५७.
शिक्षण—बी.ए. व्यवसाय—जनकल्याण सहकारी बँक, फोर्ट येथे नोकरी.
५३/७ **शशांक विष्णू**–जन्म ३० ।१० ।१९६१.
शिक्षण—एम्.एस्सी. व्यवसाय—हिंदीट्रॉन सर्विसेस प्रा. लि. मध्ये नोकरी.

## घराणे क्रमांक ४

## वंशावळी क्रमांक २

## गावडे आंबेरे–मुंबई

५४/४ **विष्णू मोरेश्वर**–व्यवसाय—शेती.
वास्तव्य—गावडे आंबेरे.
५५/५ **दामोदर विष्णू**–जन्म १८७२. मृत्यू १९३७.
भार्या : **रमा**–माहेर—अंबूताई कृष्णाजी दामले. गोळप
कन्या ६ व पुत्र ५.
कन्या :
१) **कृष्णाबाई**–मृत्यू २३ ।५ ।१९८९.
सासर—गंगाबाई गोविंद मराठे, नाताळवाला टेरेस, दादर, मुंबई—२८.
२) **नमू**–सासर—कमला रामचंद्र करमरकर, सडा, जि. रत्नागिरी. हयात.
३) **द्रौपदी (रंगू)** –सासर—इंदिरा शांताराम काळे. घर

नं. ५२, सावरकर सोसा. सहकार नगर, पर्वती, पुणे—९.
४) **सुंदरी**—जन्म १९०२. मृत्यू २३ ।८ ।१९७५. सासर—रखुमाई अनंत आपटे, भोपाळ.
५) **येसू**—जन्म १९०४. मृत्यू १९६७. सासर—राधा कृष्णाजी गोडबोले, निपाणी.
६) **चंद्री**—जन्म १९०६. मृत १९८३. सासर—राधा कृष्णाजी पालकर. पोर्तुगीज चर्चजवळ, गिरगाव, मुंबई—४
५६/६ **विश्वनाथ दामोदर**—जन्म १२ ।८ ।१९१३. मृत्यू १८ ।१ ।१९९०. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—बँक ऑफ महाराष्ट्र मधून निवृत्त. वास्तव्य—रहेजा टाऊनशिप, मालाड (पूर्व) मुंबई—९७.
भार्या : **सरला**—माहेर—इंदू आत्माराम पेंडसे, मुर्डी. मृत्यू २६ ।११ ।१९८६. अपत्य नाही.
५७/६ **सदाशिव दामोदर**—जन्म १९१८. मृत्यू ७ ।२ ।१९४९. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—पोस्ट खात्यात नोकरी. वास्तव्य—काळबादेवी, आंग्रेवाडा, मुंबई—२.
भार्या : **इंदिराबाई**—माहेर—अनू महादेव गोखले. गोळप.
५८/७ **भालचंद्र सदाशिव**—जन्म १ ।९ ।१९४८. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—खाजगी नोकरी सी.एन्.डब्ल्यू.. शेड, सुरेंद्रनगर, नागपूर १५. वास्तव्य—द्वारा वा.भा. देशपांडे. ५३ रामचंद्र नगर, नागपूर—२५.
भार्या : **मनिषा**—माहेर—गोरे, खापरखेडा.
कन्या : **प्रगति**—जन्म १९७५. पुत्र—**प्रदीप**—जन्म १९७८.
५९/६ **बाळकृष्ण दामोदर**—जन्म १९२१. मृत्यू जुलै १९४७. शिक्षण—मराठी ४ थी. व्यवसाय— शेती व भिक्षुकी अविवाहित.
६०/६ **मधुसूदन दामोदर**—जन्म २७ ।२ ।१९२५. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय—कामगार विमा योजना, मुंबईचे ऑफिसात नोकरी मॅनेजर म्हणून २८ ।२ ।८३ रोजी निवृत्त. वास्तव्य— गोरेवाडी, आनंदभुवन, खो.नं. २२, पं. सातवळेकर मार्ग, माहीम, मुंबई १६.
भार्या : **मालती**—माहेर—कुसुम विष्णू भिडे, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
६१/७ **विनय मधुसूदन**—जन्म १९५९. शिक्षण—बी.एस्.सी. व्यवसाय—एअर इंडियात मुंबई येथे नोकरी.
भार्या : **केतकी**—माहेर—मनिषा कृष्णाजी जोशी. गोपी टॉकीजजवळ. डोंबिवली.
६२/६ **दत्तात्रय दामोदर**—जन्म १८ ।८ ।१९२८ गावडे आंबेरे. शिक्षण—मॅट्रिक. व्यवसाय— लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्ये नोकरी, १ ।९ ।१९८८ पासून सेवानिवृत्त. वास्तव्य—१८ उद्यम बिल्डींग, राणी सती मार्ग, मालाड (पूर्व) मुंबई—९७.
भार्या : **सुलभा**—माहेर—सुलभा दत्तात्रय खाडिलकर, सरकारवाड्याजवळ, नाशिक.
कन्या : **वर्षा**—जन्म ३ ।३ ।१९६२ शिक्षण—बी.कॉम्. व्यवसाय—स्वतःचा रेडिमेड गारमेंटचा व्यवसाय सासर—वर्षा वसंत वर्तक. वास्तव्य—कृष्णभुवन, पारसी पंचायत रोड, सोना उद्योग समोर, अंधेरी (पूर्व), मुंबई.
६३/७ **अजित दत्तात्रय**—जन्म ५ ।२ ।१९६७. शिक्षण—बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स) व्यवसाय— ॲपलॅब आणि कं. ठाणे येथे नोकरी. १२ वी परीक्षेत १९८४ साली गुणवत्ता यादीत उत्तीर्ण.
६४/५ **सखाराम विष्णू**—पुणे येथे अविवाहित होते.
६५/५ **रावजी विष्णू**—व्यवसाय—शेती. वास्तव्य—गावडे आंबेरे, अपत्य नाही.

## गावडे आंबेरे घराणे क्रमांक ४

### वंशावळी क्रमांक ३


### गावडे
### आंबेरे—अहमदनगर—पुणे—मुंबई—नाशिक

६६/५ **कृष्ण मोरेश्वर**—मृत्यू १९२१. नाशिक गावडे आंबेरे जि. रत्नागिरी येथून अहमदनगर येथे सर्व्हे खात्यात मोजणीदार म्हणून आले व तिथेच स्थाईक झाले.
कन्या : १) **आऊताई**—जन्म १९०५. सासर—यशोदा दत्तात्रय गाडगीळ, अहमदनगर.
६७/६ **हरि कृष्ण**—शिक्षण—एल्.एल्.बी.

## घराणे क्रमांक ४


## वंशावळी क्रमांक ३

## गावडे आंबेरे–अहमदनगर–पुणे–मुबंई–नाशिक




